Scanned with OKEN Scanner

सा. क्र. २१७ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, नोव्हेंबर ६, १९९२/कार्तिक १५, शके १९१४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश व्यतिरिक्त) नियम व आदेश

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Bombay 400 032, dated the 6th November 1992

### *CORRIGENDUM*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. SEPRANI-1589/CR-92/89/13.—In Government Notification, Rural Development Department, No. SEPRANI-1589/CR-92/89/13, dated the 9th July 1992, published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part IV-B of 9th July 1992, at pages 521-523, in rule 2, in sub-rule (*b*) in sub-clause (*i*) of clause (*a*) for the words "ten years", the words "three years" shall be *substituted*.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SURESH YADWADKAR,
Deputy Secretary to Government.



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

Scanned with OKEN Scanner



(२०)

**ग्रामविकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ जुलै १९९२

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

**828**

क्रमांक एपीटी. १११८९/सीआर. ९२/८९/१३.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ५) याच्या कलम २७४, पोट-कलम (२), खंड (एकोणचाळीस) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र जिल्हा परिषदा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्र... करण्यात आले आहेत.

१. या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (तिसरी दुरुस्ती) नियम, १९९२ असे म्हणता येईल.

२. महाराष्ट्र जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ याच्या परिशिष्ट पाच-अ मध्ये,—

अ. जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग ३) (आरोग्य), श्रेणी-१ याच्याशी संबंधित नोंद क्र. १ समोर स्तंभ ४ मधील " नेमणुकीसाठी अर्हता व नेमणुकीच्या पद्धती " या शीर्षाखालील नियम (१) आणि (२) या नियमांऐवजी पुढील नियम समाविष्ट करण्यात येतील :—

१. नेमणूक पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करता येईल :—

(अ) जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग (३) (आरोग्य), श्रेणी दोनमधील योग्य आरोग्य सहाय्यकांच्यापैकी ज्यांनी,—

(१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केली आहे, आणि

(२) बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असलेला बारा महिन्यांचा मुलोद्योग प्रशिक्षण पाठ्यक्रम किंवा स्वच्छता निरीक्षकांचा मान्यताप्राप्त पाठ्यक्रम किंवा तत्सम पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केला आहे, आणि ज्यांची ह्या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंडित सेवा पूर्ण झाली आहे, किंवा

(३) कुटुंब नियोजन कार्यक्रमाखालील विस्तार शिक्षक (एक्स्टेंशन एज्युकेटर) किंवा पुरुष क्षेत्र कर्मचारी (मेन फिल्ड वर्कर) ही पदे १९६७ साली बरखास्त झाल्यामुळे त्या पदावरील कर्मचारी सेवेतून कमी करण्यात आलेले परंतु नंतर कुटुंब कल्याण कार्यक्रमाखाली समन्वयक या पदावर सामावून घेतलेले व दोन महिन्यांचा बहुउद्देशीय आरोग्य सेवा पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केलेले आणि ज्यांची त्या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंडित सेवा पूर्ण झाली आहे, किंवा

Scanned with OKEN Scanner



203

(४) ज्यांनी दोन महिन्यांचा बहुउद्देशीय आरोग्य सेवा पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केला आहे आणि त्या पदावर दहा वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंडित सेवा पूर्ण केली आहे,

अशांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल.

(ब) पुढील उमेदवारांपैकी नामनिर्देशन करून.—

(१) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसल्यास, ज्याचे वय २८ वर्षांपेक्षा अधिक नसेल,

(२) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञानशास्त्राची पदवी धारण केलीआहे, आणि

(३) ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असलेला बारा महिन्यांचा मुलोद्योग प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केला आहे असे उमेदवार.

**स्पष्टीकरण.**—खंड (अ) च्या प्रयोजनार्थ एखाद्या व्यक्तीचा आरोग्य सहाय्यक पद धारण केलेला कालावधी मोजताना त्या व्यक्तीने आरोग्य सहाय्यकाच्या एकत्रित संवर्गातील कोणतेही पद धारण केलेला कालावधी त्यात समाविष्ट करण्यात येईल.

२. पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे भरावयाच्या नेमणुकीचे प्रमाण ७५ : २५ असे असेल.

**ब.** जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग ३) (आरोग्य), श्रेणी दोन यांच्याशी संबंधित नोंद क्र. २ समोर स्तंभ ४ मधील " नेमणुकीसाठी अर्हता व नेमणुकीच्या पद्धती " या शीर्षाखालील विद्यमान नियमाऐवजी पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

जिल्हा सेवा (वर्ग ३) (आरोग्य), श्रेणी तीनमधील योग्य आरोग्य कर्मचाऱ्यांपैकी ज्यांनी ,—

(अ) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि

(१) बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असलेला बारा महिन्यांचा मुलोद्योग प्रशिक्षण पाठ्यक्रम किंवा स्वच्छता निरीक्षकांचा मान्यताप्राप्त पाठ्यक्रम किंवा तत्सम पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केला आहे. आणि त्या पदांवर दहा वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंडित सेवा पूर्ण केली आहे, किंवा

(२) दोन महिन्यांचा बहुउद्देशीय आरोग्य सेवा पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केला आहे आणि त्या पदावर दहा वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंडित सेवा पूर्ण केली आहे,

Scanned with OKEN Scanner



(ब) माध्यमिक शालांत परीक्षेला बसलेले परंतु अनुत्तीर्ण झालेले व दोन महिन्यांचा बहुउद्देशीय आरोग्य सेवा पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केला आहे आणि त्या पदावर पंधरावर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंडित सेवा पूर्ण केली आहे,

अशांना पदोन्नती देऊन भरण्यात येईल.

स्पष्टीकरण.—या निर्णयाच्या प्रयोजनार्थ एखाद्या व्यक्तीचा आरोग्य कर्मचारी पद धारण केलेला कालावधी मोजताना त्या व्यक्तीने आरोग्य कर्मचाऱ्याच्या एकत्रित संवर्गातील कोणतेही पद धारण केलेला कालावधी त्यात समाविष्ट करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुरेश यादबाडकर,
शासनाचे उप सचिव.

---

टीप.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ यामध्ये **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण, भाग चार-ब, दिनांक २० एप्रिल १९९२ याच्या पृष्ठे १७०–१७१ वर प्रसिद्ध झालेली शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक एपीटी. २४८६/१६५/सीआर-६३३/१३, दिनांक २० एप्रिल १९९२ अन्वये शेवटी सुधारणा करण्यात आली होती. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ यामधील १९९२ या वर्षातील ही तिसरी सुधारणा आहे.

यथार्थ अनुवाद,

(प. ग. पाटील,)
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.